RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १०५(३)] सोमवार, जुलै २१, २०२५/आषाढ ३०, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जुलै, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस-०४२५/प्र.क्र.८३ (३)/राउशु-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, (१९४९ चा २५) (यापुढे "उक्त नियम" असे संबोधित केले जाईल) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (ख), (ग) आणि (च) व त्याबाबतीत प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे, जसे की खालीलप्रमाणेः—

(१) या नियमांना मुंबई विदेशी मद्य (दुसरी सुधारणा) नियम, २०२५ संबोधण्यात यावे.

(२) मुंबई विदेशी मद्य नियमावली, १९५३ च्या नियम ३ च्या खंड (६) मध्ये,—

(i) उपखंड (१) मध्ये, नोंद (v) नंतर, खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात यावाः—

"(vi) महाराष्ट्र निर्मित मद्य (Maharashtra Made Liquor-MML)"

(ii) उपखंड (२) मध्ये, परिच्छेद (ङ) नंतर, खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात यावाः—

"(च) "महाराष्ट्र निर्मित मद्य (Maharashtra Made Liquor-MML)"- म्हणजे महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार मंजूर नमुना पीएलएल अर्हताधारक अनुज्ञप्तीधारकामार्फत धान्याधारित मद्यार्क वापरून आणि शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटींचे पालन करून उत्पादित केलेले कोणतेही विदेशी मद्य"."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रविंद्र औटे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
Dated the 21st July, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS 0425/C.R.83 (3)/Exc-2.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949); (hereinafter referred to as "the said Act").

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*), (*c*) and (*f*) of sub-section (*2*) read with proviso to sub section (*3*) of section 143 of the said Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953 as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Second Amendment) Rules, 2025.

2. In rule 3 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, in clause (*6*), -

(i) in sub-clause (*1*), after entry (v), the following entry shall be added, namely :—

"(vi) Maharashtra Made Liquor (MML).".

(ii) in sub-clause (*2*), after para (e), the following shall be added, namely :—

"(f) "Maharashtra Made Liquor (MML)"- means any foreign liquor manufactured within the State of Maharashtra by licensee holding licence in Form PLL as appended to the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 by using grain-based spirit and conforming to the conditions prescribed by the Government from time to time"."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAVINDRA AUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.